# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया/२०१७/ ३३४५ दिनांक :- 5/8/2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित संस्था,

विद्यापीठ संलग्न अभ्यासक्रमाच्या संस्था,

पुणे विभाग.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसंदर्भाने अनुसरावयाची कार्यपद्धती

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१७/९३६ दिनांक ०४.०८.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीया सुरु असून काही अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश फे-या संपल्या आहेत. अन्य अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश फे-या समाप्त होण्याच्या टप्प्यावर आहेत. केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तीस-या आणि अंतिम प्रवेश फेरीनंतर उमेदवारांनी संबंधित संस्थेत जाऊन रिपोर्टिंग करण्याची बाब माहितीपुस्ताकातील नियम क्र.१० (०४) C मध्ये स्पष्ट केलेली आहे.त्या अनुषंगाने सर्व संस्थांसाठी संदर्भीय पत्रानुसार सूचना देण्यात येत आहेत. सोबत संदर्भिय पत्राची छायांकित प्रत जोडत आहे. सदर पत्रातील सुचनांनुसार पुढील कार्यवाही करावी. तसेच वरील सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर जबाबदारी निश्चित करून पुढील कारवाई करण्यात येईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

Gaikwad 5.8.17

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ८१६

दिनांक : 4 AUG 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भाने अनुसरावयाची कार्यपध्दती

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू असून काही अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश फे-या संपल्या आहेत. अन्य अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश फे-या समाप्त होण्याच्या टप्प्यावर आहेत. केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या आणि अंतिम प्रवेश फेरीनंतर उमेदवारांनी संबंधित संस्थेत जाऊन रिपोर्टिंग करण्याची बाब माहितीपुस्तिकेत नियम क्रमांक १०(४) c) मध्ये स्पष्ट केलेली आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थांसाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

1. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिस-या प्रवेश फेरीनंतर प्रवेशासाठी उपस्थित होणा-या उमेदवारांकडून संबंधित संस्थांनी आवश्यक कागदपत्रे पडताळणी करून व संस्थेचे मान्य असलेल्या शुल्काची उमेदवारांच्या प्रवर्गानुसार आकारणी करणे, शुल्काची पावती संबंधित उमेदवारास देणे तसेच त्या प्रवेशाचे संचालनालयाच्या संकेतस्थळावर तात्काळ अपलोडिंग करणे अनिवार्य आहे.
2. तसेच संस्थास्तरावरील प्रवेशासाठीही संस्थांनी प्रवेश निश्चित केल्यानंतर त्या उमेदवारांच्या प्रवेशाची नोंद तात्काळ संकेतस्थळावर करून प्रवेश निश्चिती केल्याची संस्थेच्या सही शिक्कयासह प्रत उमेदवारास देणे बंधनकारक आहे, असे न केल्यास प्रवेशित उमेदवाराचा प्रवेश निश्चित केल्याचे समजण्यात येणार नाही. तसेच अशा प्रकारे प्रवेश निश्चित न करता उमेदवारांची कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत संस्थांनी त्यांचेकडे ठेवून घेऊ नयेत.
3. उमेदवाराचा प्रवेश केल्यानंतर त्याचा प्रवेश त्वरीत ऑनलाईन अपलोड करून, प्रवेशित उमेदवाराला प्रवेश पावती संस्थेच्या सही शिक्क्यासह देणे आवश्यक आहे.
4. एखादया प्रवेशित उमेदवारास अन्य संस्थे मध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने खाली नमूद केलेली प्रक्रीया पार पाडणे आवश्यक आहे.
   i. उमेदवार प्रवेशित संस्थेतील प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करील व त्यानंतर संबंधित उमेदवाराची प्रवेशीत जागा तत्क्षणी (Instantly) रिक्त समजून सदर संस्था ती जागा अन्य उमेदवारास नियमानुसार कार्यपद्धती अवलंबून देवू शकेल.
   ii. वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अन्य संस्था संबंधित उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन पध्दतीने अपलोड करून त्याची संगणकीय पावती देऊ शकेल .
   iii. उमेदवाराकडून प्रवेश रद्दकरण्याबाबत ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संस्था तात्काळ ऑनलाईन पद्धतीने प्रवेश रद्द करील आणि संस्थेच्या लॉगईन मधून प्रवेश रद्द

केल्याबाबत संगणकीय (ऑनलाईन) पोच तयार करील आणि उमेदवाराला स्वाक्षरित प्रत देईल.

5. संस्थेकडे उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रक्रिया पूर्ण करुन अर्ज केल्यास संस्थांनी अशा प्रकरणी संबंधित उमेदवाराची विनंती विचारात घेऊन त्वरीत संस्थेच्या लॉग इन मधून प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच नियमानुसार सदर उमेदवारास शुल्क परतावा करण्यात यावा. प्रवेश रद्द करण्यासाठी विनाकारण विलंब करुन उमेदवाराला अन्य संस्थेत प्रवेश घेण्यापासून रोखले जाणार नाही या बाबीची नोंद घ्यावी.

6. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश सूचनेमध्ये प्रवेशाचा कट ऑफ डेट नमूद केलेला आहे , त्या दिनांकानंतर पुढील एका कामकाजाच्या दिवसापर्यंत उशिरात उशिरा रात्रौ ११.५९ वाजेपर्यंत प्रवेशित उमेदवारांची नावे संबंधित संस्थेमार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करता येऊ शकतील. तदनंतर प्रवेशित उमेदवारांची नावे अपलोड करण्यासाठीची लिंक बंद करण्यात येईल व कोणत्याही परिस्थितीत त्यानंतर प्रवेशित उमेदवारांची नावे अपलोड करता येणार नाहीत. वरील मुदतीत संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड न केलेल्या प्रवेशित उमेदवारांचे प्रवेश कट ऑफ डेट नंतर झाल्याचे गृहीत धरुन असे प्रवेश रद्द समजण्यात येतील ही बाबही संस्थांच्या निदर्शनास आणावी. कट ऑफ डेटनंतर कोणत्याही परिस्थितीत नव्याने प्रवेश करणे किंवा आधीचे प्रवेश अपलोड करता येणार नाहीत या बाबीची गांभीर्याने नोंद घेऊन आतापासून विद्यार्थ्यांची नावे संस्थांनी अपलोड करावे. संस्थेत प्रवेशित सर्व उमेदवारांची नावे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करताना वेळेवर तांत्रिक बिघाड झाल्याची अथवा सिस्टीम संथ, इंटरनेट सुविधा खंडित असणे, विद्युत पुरवठा खंडित असणे अश्या प्रकारच्या सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यात यावे.

वरील सूचना आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. तसेच वरील सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर जबाबदारी निश्चित करून पुढील कारवाई करण्यात येईल या बाबीची नोंद घेण्यास संस्थांना कळविण्यात यावे.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
प्रत : कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष) मुख्य कार्यालय , मुंबई, यांना माहिती , पुढील कार्यवाहीसाठी व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी